दैनिक
# सत्यवादी
आपल्या लोकांचा

संपादक : शेख रेहान | www.esatyawadi.com | मो. 9822728340



मनीषा कोईरालाबरोबर काम करण्याचा अनुभव बॉबी देओलने सांगितला. यामध्ये त्याने काजोल व मनीषा कोईराला या अभिनेत्री होत्या. चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यानचा एक मजेशीर किस्सा सांगताना बॉबी म्हणाला, ''हो, मला तो प्रसंग आठवतो. आम्ही थंडीत शूटिंग करत होतो आणि जवळच एकजण चणे विकत होता. मनीषा कोईराला ते आवडीने खात होती. त्यानंतर एका गाण्याच्या सीनमध्ये तिला माझ्या हनुवटीला चावा घ्यायचा होता. पण तिच्या तोंडातून कांद्याचा वास येत असल्यामुळे मला नीट प्रतिक्रिया देणं कठीण जात होतं''.

# शेतकऱ्यांची चंगळ!

## दोन लाखाचे कर्ज माफ होणार




**आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी पाच वेळा कर्जमाफी योजना जाहीर**

**देशातील पहिली शेतकऱ्यांची कर्जमाफी ही १९८० मध्ये महाराष्ट्रात करण्यात आली होती. बॅ. अ. र. अंतुले मुख्यमंत्री असताना राज्यातील शेतकऱ्यांचे खावटी कर्ज माफ करण्यात आले होते.**

- १९८० : शेतकऱ्यांचे खावटी कर्ज माफ ( मुख्यमंत्री : अ. र. अंतुले)
- २००८ : राष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांचे कर्जमाफ **७१ हजार कोटी** -(डॉ. मनमोहन सिंग)
- २०१७-१८ : छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना **३५ हजार कोटी** (मुख्यमंत्री फडणवीस)
- २०१९-२- : महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना **२२ हजार कोटी** (मुख्यमंत्री उद्धव ठाकरे)
- २०२६ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमत्की योजना **३६ हजार कोटी** (मुख्यमंत्री फडणवीस)

**मुंबई । सत्यवादी**


राज्यातील शेतकरी बांधवांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळवून देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेस मंगळवारी (दि.२) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या योजनेत जमीन धारणेचा निकष न ठेवता दोन लाख रुपयांपर्यंत ही कर्जमाफी केली आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार अनुदान, वन टाईम सेटलमेंट असे घटक ठेवण्यात आले आहे. यातूनच आयकर भरणारे शेतकरी आणि शासकीय कर्माचाऱ्यांना वगळण्यात आले.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ज्या दिवसाची प्रतिक्षा होती. तो कर्जमाफीचा निर्णय मंगळवारी (दि.२) मंत्रीमंडळाच्या बैठकीत झाला. दीड वर्षांपासून हा प्रश्न राज्यात चर्चेत होता. या कर्जमाफीसाठी शेतकरी संघटना आणि शेतकरी आक्रमक होते. याचा पाठपुरावा सुरूच होता. यामुळे सरकारचा नाइलाज झाला आणि शेतकरी

(पान २ वर...)

### कर्जमुक्ती योजना

शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्जखात्यावरील एकत्रित थकबाकीची मुद्दल व व्याजासह अधिकतम दोन लाखापर्यंत आहे, अशा शेतकऱ्यांना (जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता) दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.



**आज पुण्यतिथी**

# सलोख्याचे महानायक मुंडे साहेब

भाजपा आज म्हणतो की, मुस्लिम मतदान करीत नाही किंवा काहीजण तर हिंदू मते मिळवण्यासाठी चक्क मुस्लिमांची मतेच नको असेही म्हणताना दिसतात. पण हा ज्याचा त्याचा राजकीय फंडा असू शकतो. मात्र बीडचे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना २००९ च्या लोकसभा निवडणुकीत बीड शहरातील मोमीनपुरा भागातून १५ हजारांपेक्षा जास्त मतांची लीड मिळाली होती. यामुळे इतकी मोठी लीड घेणारे भाजपाचे मुंडे साहेब हे एकमेव नेते ठरले आहेत. हे पाहता आजची भाजपा आणि नेते मुस्लिम कमळाला मतदान करत नाही असे म्हणतात त्यांना आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

नेते तर अनेक होतात पण त्यातून मोजकेच लोकनेते होतात. त्यांच्यापुढे कोणतेही कारण टिकत नाही की, भिंत उभी राहत नाही. असेच नेतृत्व म्हणून लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे आहेत. त्यांनी कधीही जातपात पाहिली नाही केवळ माणूस म्हणून त्यांची काम करण्याची पद्धत होती. यामुळे ते सर्वांनाच आपले वाटायचे, नेहमीच त्यांनी सामान्य माणसाचा आवाज म्हणून काम केले. यामुळेच मुंडे साहेब भाजपाचे असतानाही मुस्लिमांना कमळाचा झेंडा खांद्यावर घेऊन त्यांच्या प्रचारासाठी आणि समर्थनात रस्त्यावर उतरण्यासाठी संकोच वाटला नाही. कारण की, त्यांनी मुस्लिम समाजाला परक्या पणाची वागणूक दिली नाही. ते नेहमीच हिंदू-मुस्लिम सलोख्याचे महानायक ठरले, यामुळे मुस्लिम समाज ही त्यांच्यावर त्याप्रमाणेच प्रेम करीत असत, यामुळे भाजपा आणि कमळ याने कधीच मुंडे साहेब आणि मुस्लिम समाजात भिंत उभी करु शकला नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे २००९ च्या लोकसभा निवडणुकीत बीड शहरातील मुस्लिम बहुल भाग असलेल्या मोमीनपुऱ्यातून त्यांना तब्बल १५ हजारांपेक्षा जास्त मतांची

(पान २ वर...)

## दुनियादारी

### दोन एसटी धडकल्या; सात प्रवाशांचा मृत्यू

सुरत...

गुजरातमधील सुरत जिल्ह्यातील बारडोली येथील उवा गावाजवळ मंगळवारी भीषण अपघात झाला. महाराष्ट्रातील दोन एसटी बस आणि ट्रॅक्टरच्या या विचित्र अपघातात जवळपास ७ जणांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक वृत्त आहे. तर, ३८ हून अधिक प्रवासी जखमी आहेत. सुरतहून धुळ्याकडे जाणाऱ्या एसटी बसला पाण्याच्या टँकरची धडक लागली. त्यामुळे या बसच्या चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे ही बस दुभाजकाला जाऊन आदळली. दुभाजकाच्या पलीकडील मार्गावरून जळगाव-सुरत बस धावत होती. धुळे-सुरत बसची जळगाव बसला जोरात धडक लागली. यामुळे भीषण अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की धुळे-सुरत बस दोनवेळा उलटली आणि मग बसने पेट घेतला.

### सीबीएसईमध्ये मोठे बदल!

नवी दिल्ली...

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ऑनस्क्रीन मार्किंग प्रणालीच्या मूल्यांकन प्रक्रियेतील त्रुटींमुळे मोदी सरकारने मोठा निर्णय घेत सीबीएसईचे अध्यक्ष आणि सचिवांची बदली केली आहे. बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये सीबीएसईचे सचिव म्हणून कार्यरत असलेले हिमांशू गुप्ता आणि सीबीएसईचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले राहुल सिंह यांचा समावेश आहे. बदलीचा आदेश दिल्यानंतर काही तासांतच, केंद्राने सीबीएसईचे नवीन अध्यक्ष म्हणून लोखंडे प्रशांत सीताराम आणि मंडळाचे पुढील सचिव म्हणून वरुण भारद्वाज यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

### भारतात परतल्यावर मला अटक होऊ शकते!

**नवी दिल्ली...**

कॉकरोच जनता पक्षाचे ३० वर्षीय संस्थापक अभिजीत दिपके ६ जून रोजी अमेरिकेतून भारतात परतणार आहेत. ''भारतात परतल्यानंतर मला अटक होऊ शकते, पण तरीही मी भारतात येणार आहे'', असं त्यांनी टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना सांगितलं. ''मला आता थेट विमानतळावरच भेटा'', असं त्यांनी समर्थकांना आवाहन केलं आहे.

### ट्रम्पने बेंजामिनला झापले!

**वॉशिंग्टन डीसी...**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, पुढील एका आठवड्यात होर्मुज सामुद्रधुनी (स्ट्रेट) उघडण्याबाबत करार होऊ शकतो. त्यांनी सोमवारी एबीसी न्यूजला सांगितले की, जर करार झाला तर ती लष्करी विजयापेक्षाही मोठी उपलब्धी असेल. '' ट्रम्प यांनी यापूर्वी दावा केला होता की, त्यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना लेबनॉनची राजधानी बेरूतवर मोठ्या प्रमाणावर हल्ला करण्यापासून रोखले होते. एक्सिओस न्यूजच्या वृत्तानुसार, ट्रम्प यांनी नेतन्याहू यांना फोन करून फटकारले देखील. त्यांनी इशारा दिला की, जर इस्रायलने लेबनॉनवर मोठ्या प्रमाणावर बॉम्बफेक केली तर आंतरराष्ट्रीय स्तरावर तो आणखी वेगळा पडू शकतो.

# डॉक्टर पत्नीला शिक्षक पतीकडून बेदम मारहाण

**परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**परळी । सत्यवादी**

परळी वैजनाथ येथील एका डॉक्टर महिलेने आपल्या पतीविरुद्ध मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार दाखल केल्यानंतर परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. ताहेरा बेगम सय्यद नोमान बशीर (वय ३७, रा. हा मु पेठ मोहल्ला, परळी वैजनाथ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचे पती बीड येथील बालेपिर भागातील रहिवाशी असलेले सय्यद नोमान बशीर सय्यद, व्यवसाय शिक्षक,( इमदादुल उलूम माध्यमिक शाळा आझाद नगर परळी वैजनाथ) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११५(२), ३५२ व ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, पती-

(पान २ वर...)

# अंधभक्तांसाठी पुन्हा खुष खबर पेट्रोल-डिझेल महागणार!

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर भारतातील तेल कंपन्या पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत २.५ रुपयांपर्यंत वाढ करू शकतात. सध्या देशात १५ मे पासून आतापर्यंत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत प्रति लिटर सुमारे ₹७.५ ची वाढ झाली आहे. रेटिंग एजन्सी क्रिसिलने मंगळवारी (२ जून) आपल्या अहवालात दावा केला की, जर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती अशाच वाढत राहिल्या, तर तेल कंपन्या आपले नुकसान कमी करण्यासाठी येत्या काही दिवसांत एकूण वाढ प्रति लिटर ₹१० पर्यंत नेऊ शकतात.

अहवालानुसार, इंधनाच्या

(पान २ वर...)



# शेतकऱ्यांचा एल्गार;ओंकार शुगर्सचे मुख्यद्वार रोखले

**कारखानदाराची आडमुठी भूमिका तर शेतकरी निर्णयावर ठाम**



**परळी । सत्यवादी**

परळी तालुक्यातील ओंकार शुगर युनिट क्र ८ पांगरीने मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊसाची देयक घोषित दरानुसार अदा करावीत या मागणीला घेत ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे सलग दुसऱ्या दिवशी लोकशाही मार्गाने सत्याग्रह आंदोलन सुरू

(पान २ वर...)

# तुतारी गट आक्रमक;मागण्या मान्य न झाल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा

**मुख्याधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक**

**बीड । सत्यवादी**

मान्सून सुरू झाला असला तरी बीड नगर परिषदेतील सत्ताधारी आणि प्रशासनाने स्वच्छता, वीज, पाणीपुरवठा तसेच विकासकामांसंदर्भात कोणतीही ठोस उपाययोजना हाती घेतलेली दिसत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वाखाली बीड शहर विकास आघाडीच्या माध्यमातून

(पान २ वर...)



# गांजाच्या साठ्यावर पोलीसांचा छापा

**तब्बल आठ लाखांचा मुद्देमाल जप्त;एक ताब्यात**

**परळी । सत्यवादी**

येथील रामनगर भागात राहत्या घरात गांजा साठवून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत गांजाचा मोठा साठा जप्त केला असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले सुमारे ७ लाख ८७ हजार ७४० रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, परळी शहरातील रामनगर परिसरात राहत्या घरात गांजा साठवून विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पथकाने तात्काळ परळी येथे जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने राजीव/राजू मोहिते यांच्या घरावर छापा टाकला. छाप्यामध्ये घरात मोठ्या प्रमाणात गांजाचा साठा आढळून आला.

(पान २ वर...)

# सम्राट अशोक नगरच्या नागरिकांची भर उन्हात पाण्यासाठी लाही लाही!

**माजलगावात नगरसेवक नुसते नावालाच**



**माजलगाव । सत्यवादी**

माजलगाव शहरातील सम्राट अशोक नगर परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांना भर उन्हात पाण्यासाठी अक्षरशः लाही लाही होत आहे. एकीकडे तापमानाचा पारा चढलेला असताना दुसरीकडे अपुरा व अनियमित पाणीपुरवठा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनला आहे. मात्र या गंभीर समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. परिसरातील अनेक

(पान २ वर...)

# सत्ताधाऱ्यांनी २४ हजार कोटी रुपये कोणासाठी उडवले?




'अब की बार, चारसो पार' चा नारा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजप ने दिला. तसंही त्यांना 'अब की बार'चं आकर्षण फार. पण यावेळी २००४ च्या 'इंडिया शायनिंग' च्या अति आत्मविश्वासाचीच पुरानरावृत्ती २० वर्षांनी झाली. आणि 'चारसो पार' तर दूरच, पण स्पष्ट बहुमतही भाजपला मिळवता आलं नाही. अर्थात विरोधकांच्या नाकर्तेपणामुळे २००४ सारखं आघाडी सरकार देखील विरोधकांना बनवता आलं नाही. हे भाजपच्या पथ्यावर पडलं, नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू या दोन कुबड्या घेऊन मोदी कसेतरी पुन्हा सत्तेत आले.

पण लोकसभेपाठोपाठ महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक होती. महाराष्ट्रात महायुती लोकसभेच्या निकालात महाराष्ट्रातील ४८ पैकी २०१९ सारख्या ४१ नव्हे, अवघ्या १७ जागांवर घसरली आणि भाजप स्वतःतर २३ वरून ९ जागांवर आली. या निवडणुकीत २८८ पैकी सुमारे १५० विधानसभा क्षेत्रात महायुती पिछाडीवर होती. तेव्हा राज्यात पुन्हा सत्तेत येण्यासाठी त्यांना जादूच्या कांडीची आवश्यकता होती. ती त्यांना मध्यप्रदेशाच्या 'मामाजीं'च्या अनुभवातून सापडली. 'लाडली बहना' या योजनेच्या कृपेने शिवराज सिंह चौहान ऊर्फ 'मामाजी' यांनी मध्य प्रदेशात पक्षाला विजय मिळवून दिला होता. त्या 'लाडली बहना'चं मराठीकरण करून घाईगर्दीनं ही योजना लागू करण्यात आली. अर्ज भरणाऱ्यांपेक्षा ते स्वीकारणाऱ्यांचीच खरी कसरत होती. कारण निर्णय होईपर्यंत जून महिन्याचा अखेर उजाडला.

नोव्हेंबर मध्ये निवडणूक, तेव्हा किमान चारपाच महीने तरी ही योजना राबवली जाणं 'बहिणीं'ना पैसेवाटप होत राहाणं- आवश्यक होतं. त्यामुळे जो अर्ज आला, त्याची कुठलीही छाननी न करता पैसे खात्यात जमा करायचे होते. अर्ज घेण्यास उशीर झाला तरी पूर्वलक्ष्यी प्रभावानं १ जुलै २०२४ पासून प्रत्येकाच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले. छाननी झाली नसल्यानं काही हुशार भावांना देखील ओवाळणी देण्यात आली. पूर्वी आपण ऐकत होतो, की उमेदवार पैसे वाटून मतं मागतात. पण निदान उमेदवार आपल्या कमाईतून ते वाटत असे. आता तर चक्क सरकारी तिजोरीतून पैसे वाटून मतांची बेगमी करण्याचा हा राजमार्ग झाला. पुढे इतर राज्यांतही हाच प्रयोग करण्यात आला. या जादूच्या प्रभावाने निवडणूक जिंकून सत्तेत स्थिरस्थावर झाल्यानंतर अर्जांची छाननी करण्याची फुरसत मिळाली, तेव्हा कुठे गैरप्रकार लक्षात येऊ लागले. आणि आता म्हणजे सुमारे दोन वर्ष लोटल्यावर सरकारच्या लक्षात येतंय, की आपण पैसे देत असलेल्यांतले एक तृतीयांश लोक यास पात्रच नाहीत. तेव्हा मार्च २०२६ पासून त्यांना पैसे देणं बंद केलं; अशी बातमी आहे. त्यामुळे 'राज्य सरकारचे दरमहा १२०० कोटी रुपये वाचणार' असाही उल्लेख या बातमीत आहे. पण म्हणजेच १ जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२६ पर्यन्त अर्थात वीस महीने या लोकांना योजनेस पात्र नसतांना हे पैसे दिले गेले; त्याचं काय? वीस महिन्याचे दरमहा १२०० कोटी प्रमाणे २४००० कोटी रुपये ११ लाख कोटींच्या कर्जात दाबलेल्या सरकारी तिजोरीतून असेच वाटले गेले.

महाराष्ट्रातील मतदारांची संख्या ९ कोटीच्या आसपास आहे. या योजनेचे आमिष दाखवून २.४७ कोटी मतदारांना प्रभावित केलं गेलं. म्हणजे २५ टक्क्याहून अधिक मतदारांना आमिष दिलं गेलं. त्यातले हे आज रद्द झालेले ८१ लाख म्हणजे साधारण ९ टक्के मतदार आहेत. निवडून येणाऱ्या जागांवर एक दोन टक्क्यांनीही लक्षणीय परिणाम होतो. इथे तर ही टक्केवारी २५ टक्क्यांपर्यंत गेलेली दिसते. म्हणजे ही निवडणूक किती निष्पक्ष होती? पण हे ठरवायला निवडणूक आयोग किती निष्पक्ष आहे, तेही पाहावं लागेल. मुळात फुकट वाटप योजना आणि लोककल्याणकारी योजना, यातला फरकच आज पद्धतशीरपणे सर्वच पक्षांकडून मिटवला जातो आहे. त्यांनी १५०० देऊ केले, हे चूक आहे; असं न म्हणता, विरोधी पक्ष 'आम्ही त्याहून अधिक देतो,' असं म्हणताना दिसताहेत; ही आपली शोकांतिका. लोककल्याणकारी योजना या खासकरून सामाजिक आर्थिक दृष्ट्या वंचित राहिलेल्या वर्गांच्या कल्याणासाठी राबवायच्या असतात. म्हणजे शिक्षण, स्वास्थ्य, रोजगार वगैरे. पण आपल्याकडे फुकट वीज, फुकट बस प्रवास, फुकट धान्य यावर सर्वच पक्षांचा जोर दिसतो. यातून कोणाचे आणि काय कल्याण होणार? त्याचा खर्च सरकारी तिजोरीतून होणार. त्या तिजोरीत पैसे येण्याचा स्त्रोत कोणता? तर लोकांकडून जमा होणारा कर, हा तो स्त्रोत होय. रोजगार हमी योजना सुरू करताना वि. स. पागे यांनी, ज्यांच्याकरिता ती योजना आहे, त्यांच्यापेक्षा वरच्या उत्पन्न गटाकडून व्यवसाय कर घेऊन सदर योजनेसाठी पैसा उभा केला होता. पण आज राज्य सरकारच्या तिजोरीत येणारा पैसा हा अप्रत्यक्ष करातून येतो. म्हणजे 'जीएसटी'तून. हा कर ज्यांच्यासाठी म्हणून ही योजना आहे, त्यांच्याच खिशातून काढला जाणार. म्हणजे लाडक्या बहिणींना ओवाळणी देण्याकरता लाडक्या भाऊजींच्या पाकिटातून आणि दोडक्या बहिणींच्या पर्समधूनच पैसे काढावे लागणार. अशा योजना लोकांना प्रभावित करू शकतात कारण लोकांनाच त्याच्यामागचं राजकारण वा अर्थशास्त्र याकडे डोळेझाक करून जे फुकट मिळेल, ते लुबाडून घेण्याचा हव्यास आहे. म्हणजे केवळ राजकारण्यांकडे बोट दाखवून चालणार नाही. तीन बोटं आपल्याकडेही वळलेली आहेत, हे ध्यानात घ्यायला लागेल.

---

पान १ व ४ वरुन...

## शेतकऱ्यांची चंगळ!

बांधवांना मोठा दिलासा देणारा आणि ऐतिहासिक असा निर्णय घेतल्याबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत सर्व मंत्रीगण सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले व या निर्णयाचे स्वागत केले. या योजनेत कर्जमुक्ती, 'वन टाईम सेटलमेंट' व प्रोत्साहनपर लाभ असे तीन घटक केल्याने, राज्यातील बहुतांश शेतकरी बांधवांना याचा लाभ होणार आहे. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा कमी आहे, त्यांना दोन लाख रुपयांपर्यंत माफी मिळाल्याने असे शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार आहेत. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा अधिक आहे, त्या शेतकऱ्यांना दोन लाखांवरील थकबाकी ३१ मार्च २०२७ पूर्वी भरण्यास मुदत देण्यात येणार आहे. त्यांच्या खात्यातही दोन लाख रुपये शासन जमा करणार आहे. तर याशिवाय प्रोत्साहनपर लाभ योजनेत कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिकाधिक पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. या योजनेत राजकीय पदाधिकारी, सरकारी कर्मचारी व आयकर पात्र व्यक्ती, सहकारी संस्थांचे २५ हजार रुपयांहून अधिक वेतन असणारे अधिकारी, कर्मचारी पात्र नसतील.

## सलोख्याचे महानायक मुंडे साहेब

लीड होती. हे आज जे म्हणतात मुस्लिम भाजपाला मतदान करीत नाही त्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहे. मुस्लिम कोणालाही मतदान करतो फक्त त्याला विश्वास आणि सुरक्षा पुरवणारा आणि आपलासा व्यक्ती पाहिजे, तेच काम मुंडे साहेबांनी केले होते. १९९३ मध्ये तणावाचे वातावरण असतानाही मुंडे साहेबांनी मुस्लिम भागात घुसून दिलासा दिला होता. ते आले की, तणाव निवळला होता. हे दोन्ही किस्से राज्यात प्रसिद्ध आहेत. यामुळे मुस्लिमांना टार्गेट करणाऱ्या आणि बोटे मोडणाऱ्या आजच्या भाजपा आणि त्याच्या नेत्यांना आत्मपरीक्षणाची गरज आहे. तसेच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मुंडे साहेब यांना बोलताना मुस्लिम भागातून तुम्ही मताधिक्य घेतात हीच खरी तुमची आणि युतीची शक्ती असल्याचे सांगितले होते. अशा या महान लोकनेत्याचे आज स्मृतिदिन असल्याने त्यांना विनम्र अभिवादन..!

## अंधभक्तांसाठी खुष खबर

किमतीत प्रति लिटर ₹७.५ ची ही वाढ थेट किरकोळ महागाईत सुमारे ३६ बेसिस पॉइंट्स (०.३६%) वाढ करू शकते. तर, जर ही वाढ प्रति लिटर ₹१० पर्यंत पोहोचली, तर महागाईवरील याचा परिणाम वाढून सुमारे ४८ बेसिस पॉइंट्स (०.४८%) होईल. अहवालानुसार, इंधन महाग झाल्याने वाहतूक, लॉजिस्टिक्स आणि उत्पादन खर्च वाढेल, ज्याचा थेट परिणाम येत्या काही महिन्यांत खाद्यपदार्थ आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किमतींवर दिसून येईल.

भारतात मालवाहतुकीचा सुमारे ७१% भाग रस्ते वाहतुकीद्वारे होतो आणि वाहतूकदारांच्या एकूण परिचालन खर्चात इंधनाचा (डिझेल) वाटा सुमारे ४२% असतो. किरकोळ इंधन महाग झाल्याने वाहतूक खर्च वाढेल, ज्यामुळे संपूर्ण पुरवठा साखळी प्रभावित होईल. क्रिसिलच्या मते, वाहतुकीवर अवलंबून असलेल्या खाद्य श्रेणी सर्वाधिक प्रभावित होतील.

क्रिसिलने सांगितले की, कापड, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स, लाकडी उत्पादने आणि सिमेंट व सिरॅमिक्ससारख्या बांधकाम सामग्रीचे उद्योग सर्वाधिक वाहतूक-केंद्रित (परिवहन-आधारित) आहेत. मागणी स्थिर असल्याने कंपन्या वाढलेल्या खर्चाचा भार थेट ग्राहकांवर टाकू शकतात किंवा किंमत तीच ठेवून पॅकेटचा आकार लहान करण्याचा मार्ग अवलंबू शकतात. याव्यतिरिक्त, रसायने, कोळसा आणि धातूंशी संबंधित उत्पादनांची इनपुट कॉस्ट (उत्पादन खर्च) देखील वाढेल.

कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने तेल कंपन्यांवर दबाव होता. त्यामुळे कंपन्यांनी तोट्याची भरपाई करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. जर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये दीर्घकाळ वाढ कायम राहिली तर पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी वाढवल्या जाऊ शकतात.

## तुतारी गट आक्रमक ;मागण्या

तुतारी गटाच्या सर्व नगरसेवकांनी आज मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात आढावा बैठक घेतली.

या बैठकीत नगरसेवकांनी विविध नागरी समस्यांवर सविस्तर चर्चा करून मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात बीड शहरातील मोठे नाले व गटारांची मान्सूनपूर्व सफाई करणे, शहरात सुरळीत पाणीपुरवठा करणे, बंद असलेले पथदिवे सुरू करणे, सर्व कब्रस्ताने व स्मशानभूमींमध्ये हायमास्ट दिवे बसविणे, संस्कार शाळेसमोरील रस्त्यावरील मंडईचे स्थलांतर अहिल्याबाई होळकर सभागृहाच्या प्रांगणात करणे, शहरातील रस्ते विकासाची कामे तातडीने सुरू करणे आदी मागण्या करण्यात आल्या.

तसेच अमृत जल योजनेचे काम पूर्ण झाल्याशिवाय रस्त्यांवर हँडवर्क करण्यात येऊ नये, आठवडी बाजारामुळे सुभाष रोडवर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी भाजीपाला विक्रेत्यांना यशवंत उद्यानाच्या पाठीमागे, विजय टॉकीजच्या पूर्व बाजूस किंवा बिंदुसरा नदीच्या पश्चिमेकडील रस्त्यावर स्थलांतरित करावे, कामगारांना वेळेत कामगार प्रमाणपत्र द्यावे, रोजंदारी कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करावे, विवाह नोंदणी व प्रमाणपत्रे वेळेत द्यावीत, आवश्यक रोड क्रॉसिंग तातडीने बांधावीत तसेच जन्म-मृत्यू दाखले आणि इतर प्रमाणपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत, अशा विविध मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्व नगरसेवक नागरिकांच्या हक्कांसाठी तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा तुतारी गटाच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आला.

यावेळी गटनेते खुर्शीद आलम, नगरसेवक भारत कांबळे, अय्युब खान, शेख अथहर, अशोक काळे, शेख अफसर, किशोर पिंगळे, मसूद खान, शेख रईस, जाधव साहेब, मसी भाई, शेख रोहिल, मोमीन मोहसीन, ग्राम पाटील यांच्यासह तुतारी गटाचे सर्व नगरसेवक उपस्थित होते.

## डॉक्टर पत्नीला शिक्षक

पत्नीमध्ये मागील काही काळापासून पतीचा एका शिक्षिका सोबत अनैतिक संबंध सुरू असल्या मुळे वाद सुरू होता. दरम्यान, ५ मे २०२६ रोजी रात्री झालेल्या वादातून आरोपी पतीने पत्नीस मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मारहाणीत फिर्यादी महिला अतिशय गंभीर जखमी झाल्याने खाजगी रुग्णालयात उपचार घेत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सदर प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०१४०/२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल शिंगणे करीत आहेत. या घटनेमुळे परळी शहरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## शेतकऱ्यांचा एल्गार ;ओंकार

असून आंदोलनकर्त्यांशी अप्पर पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी भेट देत मध्यस्थी करण्याच्या प्रयत्न केला मात्र आडमुठ्या साखर कारखानदारानी सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने शेतकऱ्यांनी अखेर साखर कारखान्याचे मुख्य प्रवेशद्वार आडवत आंदोलन सुरू ठेवले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांनी ज्या वैद्यनाथ साखर कारखान्याची स्थापना केली त्याच साखर कारखान्यास स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृति दिनाच्या पूर्वसंध्येला शेतकऱ्यांना हक्कासाठी कारखाना प्रवेशद्वार बंद करण्याची नामुष्की ओढवली असून मागण्या मान्य न झाल्यास स्मृतिदिनी टाळे लावण्याचा इशारा ही यावेळी देण्यात आला.

ओंकार शुगर्स कडून मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊस देयक प्रश्नी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती वेळोवेळी निवेदने, आंदोलने करत आलेली असून दि ८ मे रोजी केलेल्या बेमुदत सत्याग्रह आंदोलन प्रसंगी कारखाना प्रशासनाने दि २५ मे पर्यन्त घोषित केलेल्या २९५० रु प्रमाणे सर्व शेतकऱ्यांना ऊस देयक अदा करण्यात येतील असे लेखी अभिवचन देत १८०० रु वर्ग देखील केली.एकाच गळीत हंगामात सुरुवातीला २९५० दर पश्चात १८०० रुपये देयक दिली. मात्र मे महिना संपला तरी कारखाना प्रशासनाकडून घोषित केलेल्या गाळप केलेल्या ऊसाबाबत शेतकऱ्यांना घोषित दरानुसार देयक अदा करण्याबाबत चालढकल होत असल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी दि १ जून पासून बेमुदत सत्याग्रह आंदोलन सुरू केले. कारखाना प्रशासनाने आडमुठी भुमिका घेतल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी ओंकार शुगर्सचा मुख्य प्रवेशद्वार आडवत मंगळवार दि २ रोजी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा श्रमाचा मोबदल्याकरिता सत्याग्रह आंदोलन सुरू आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सत्याग्रह आंदोलनास अप्पर पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी भेट देत कायदा आणि सुव्यवस्था यांची पाहणी करत शेतकरी लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन करत असल्याने हे आंदोलन मिटवण्यासाठी प्रयत्न करत कारखाना प्रशासनाशी चर्चा केली मात्र आडमुठ्या साखर कारखाना प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने शेतकरी आपल्या मागण्यांवर ठाम राहून ऊस देयक घेतल्याशिवाय माघार घेणार नसल्याचे सांगत मागण्या मान्य न झाल्यास या कारखान्याची उभारणी करणाऱ्या स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतीदिनी कारखान्यास टाळे लावण्याचा इशारा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी दिला. या सत्याग्रह आंदोलनात संघर्ष समितीचे ॲड. अजय बुरांडे यांनी सांगितले या प्रसंगी पांगरी, लिंबोटा, कौडगाव यासह परिसरातील ॲड.श्रीनिवास मुंडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे,प्रभाकर पौळ, लक्ष्मण पौळ, कॉ.भगवान बडे, रघुनाथ दादा देशमुख, बीबीशन गित्ते, बाळासाहेब मुंडे, हनुमंत लोंढे, कृष्णा कराड, दत्तात्रय तिडके,एड.प्रकाश मुंडे, सूर्यकांत तिडके, रमेश पौळ यांच्या सह असंख्य शेतकरी आंदोलनात सहभागी झाले आहेत.

## गांजाच्या साठ्यावर

या कारवाईत राहुल राजू मोहिते (वय २६, रा. रामनगर, परळी) याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी आरोपीकडून २६ किलो गांजा जप्त केला असून त्याची अंदाजे किंमत ₹७,८७,७४० इतकी असल्याचे सांगण्यात आले. ही कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम,अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात करण्यात आली पो.हे.कॉ.केकान,पों.ना. भताने,पो आंधळे व परळी पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांसह परळी पोलिसांनी कारवाई केली.जप्त केलेला गांजा पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## सम्राट अशोक नगरच्या

घरांमध्ये नळाला अत्यल्प दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांना पुरेसे पाणी साठवता येत नाही. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

प्रसंगी अनेक नागरिकांनी आपल्या अडचणी नगरसेवकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला, फोनद्वारे संपर्क साधून उपाययोजना करण्याची विनंती केली. मात्र समस्येची दखल घेण्याऐवजी नगरसेवकांनी परिसराकडे फिरकलेही नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

निवडणुकीच्या काळात मतांसाठी घराघरात येणारे लोकप्रतिनिधी आता नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्नावर कुठे आहेत ? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. भर उन्हात पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी संघर्ष करावा लागत असल्याने नागरिकांचा रोष दिवसेंदिवस वाढत आहे. सम्राट अशोक नगरमधील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करून पाणी उपलब्ध करून द्यावे व कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या वेळी देण्यात आला आहे.

**नागरिक पाण्यासाठी त्रस्त, पण जबाबदार मात्र मस्त,**

पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यासाठी नागरिकांना भर उन्हात आक्रोश करावा लागत असेल, तर ही केवळ पाणीटंचाई नसून व्यवस्थेच्या अपयशाची जिवंत साक्ष आहे,

अशी उपरोधिक प्रतिक्रिया परिसरातील नागरीकांतून व्यक्त होत असून प्रशासन व लोकप्रतिनिधी आता तरी जागे होणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## कोट्यावधी निधीची

करणाऱ्या अधिकाऱ्यांना वारंवार सूचना देऊनही याबाबत कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर सदर कामाची स्वतंत्र चौकशी, तांत्रिक गुणवत्तापडताळणी व अंदाजपत्रकाशी पडताळणी करण्यात यावी, तसेच काम समाधानकारकरीत्या पूर्ण झाल्याशिवाय निधी अदा करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. दोषी ठेकेदार व संबंधित जबाबदार अधिकारी यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी ज्येष्ठ नेते बाबासाहेब गर्जे यांनी केली आहे.

## श्रीमती शारजाबाई

त्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरणा दिली. त्यांच्या कष्ट, त्याग व संस्कारांमुळे कुटुंबातील त्यांचा मुलगा पोलीस कर्मचारी झाला. देशमुख गल्ली परिसरात त्या सर्वांच्या परिचयातील व आदराचे स्थान असलेल्या व्यक्ती होत्या. त्यांच्या साध्या, सरळ व मनमिळावू स्वभावामुळे परिसरातील नागरिकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. धार्मिक व अध्यात्मिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग असे. कैलासवासी शारजाबाई डाके यांच्यावर काल दि. २ जून रोजी दुपारी ४ वाजता सार्वजनिक स्मशानभूमी वैकुंठधाम, परळी वैजनाथ येथे अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. पोलीस दलातील कर्मचारी गोपीनाथ डाके यांच्या त्या मातोश्री होत.

## रुग्णसेवक अमजद खान यांना

सर्वात मोठे आणि मनाला चटका लावणारे वैशिष्ट्य म्हणजे, बीड शहर व परिसरात ज्या मृतदेहांचा सांभाळ करायला कोणी नातेवाईक नसतात, अशा कित्येक लावारिस मृतदेहांवर अमजद खान स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून अत्यंत सन्मानपूर्वक अंतिम संस्कार (दाहसंस्कार) करतात. जात, पात किंवा धर्माच्या पलीकडे जाऊन केवळ 'माणुसकी' हाच एक धर्म मानून त्यांनी आजवर शेकडो लावारिसांना सन्मानाने निरोप दिला आहे.

२० जून रोजी भव्य सोहळ्यात वितरण

हा ऐतिहासिक आणि भावनिक गौरव सोहळा येत्या शनिवार, २० जून २०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे अत्यंत दिमाखात पार पडणार आहे. या कार्यक्रमाला माननीय आमदार विजयसिंह राजे पंडित, नगराध्यक्षा प्रेमलता ताई पारवे यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याच गरिमामयी उपस्थितीत अमजद खान यांना हा सन्मान प्रदान करण्यात येईल.

## फिल्टर पाणी'चे आश्वासन हवेत विरले

आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पिण्यायोग्य पाणी देणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी असताना नागरिकांना घाण पाण्याचा सामना करावा लागत असल्याने संतापाची लाट उसळली आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते सय्यद मोईन यांनी पाटोदा तहसीलदार यांना निवेदन सादर करून उन्हाळ्यात दुर्गंधीयुक्त उसाचा रस उपलब्ध करून देणाऱ्या नगरपंचायत प्रशासनाचा नागरी सत्कार करण्यासाठी परवानगी देण्याची मागणी केली आहे. शुद्ध पाणी देण्यात अपयशी ठरलेल्या प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात हा उपरोधिक निषेध असल्याचे त्यांनी म्हटले आहे.दरम्यान, सय्यद मोईन यांनी दुर्गंधीयुक्त पाण्याची बाटली आणि निवेदन सोशल मीडियावर प्रसिद्ध केल्यानंतर नागरिकांनीही संतप्त प्रतिक्रिया देत नगरपंचायत प्रशासनाचा खरपूस समाचार घेतला. अनेकांनी पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

## एसआयआर कामकाजात अचूकता व

सविस्तर माहिती देत मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले.बैठकीत नवीन मतदार नोंदणी, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे, मतदारांच्या माहितीतील दुरुस्त्या तसेच फॉर्म क्रमांक ६, ७ व ८ संदर्भातील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदार मॅपिंगच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला असून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी मतदार यादी अचूक व अद्ययावत असणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने काम करावे, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री. घोडे पाटील यांनी केले.या बैठकीस तहसीलदार श्रीकांत निळे, गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे, नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, गटशिक्षणाधिकारी कोकणे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चिंचाळकर तसेच तालुक्यातील सर्व बूथ लेव्हल अधिकारी (इङज) व पर्यवेक्षक उपस्थित होते.

## २५ वर्षे अपघातमुक्त सेवेसाठी

सुरक्षित वाहनचालन कौशल्यामुळे आणि सेवाभावी वृत्तीमुळे ते एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले. गाढे पिंपळगाव गावासाठी हा सन्मान अभिमानाची बाब ठरली असून, परळी आगारातून एकमेव चालक म्हणून झालेल्या त्यांच्या निवडीमुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## केंद्रेकर यांनी आखून दिलेली लक्ष्मण रेषा

शहराचे व नगरपालिकेचे हसू झाले आहे. अतिक्रमण हटाव चे आदेश देणाऱ्यांनीच नंतर या मोहिमेत कर्तव्यावर असलेल्या एका अधिकाऱ्याला तडकाफडकी निलंबित केले तर दुसऱ्यास कारणे दाखवा नोटीस बजावली हे पाहून राजकारण किती खालच्या स्तराला गेले आहे हे दिसून आले.

आजीमायला रस्त्याच्या ज्या मध्यभागावरून उठविण्यात आले होते त्याच जागी दुसरे अजून चार-पाच विक्रेते बसून व्यवसाय करू लागले आहेत. ज्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या रहदारीला आणि वाहतुकीला नेहमीप्रमाणेच त्रास होऊ लागला आहे.

हा त्रास कमी होता की काय, या आजी मायचा मुलगा मंडईत येऊन सुनील केंद्रेकर साहेबांनी आखून दिलेल्या लक्ष्मण रेषेच्या आत आपला व्यवसाय करणाऱ्यांनाही नेत्यांची आणि लोकप्रतिनिधींची नावे घेऊन धमक्या देऊ लागला आहे. लक्ष्मण रेषा-फेषा काही नाही, आता बघतोच कोण आम्हाला रस्त्यावरून पुन्हा उठवितो ते आणि रेषेच्या आत किंवा बाहेर कोणी कसा धंदा करतो ते, असे म्हणत मंडईत व्यवसाय करणारे भाजीपाला विक्रेते आणि फळ फळावर विक्रेत्यांमध्ये भयाचे वातावरण निर्माण करू लागला आहे.

यामुळे विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून त्याच्या अशा प्रकारे धमक्या देण्यामागे त्याच्या मागे शासन-प्रशासन, नेते, लोकप्रतिनिधी यापैकी कोणाची फूस आहे? किंवा त्याला कोण बळ देत आहे? असे प्रश्न सुद्धा उपस्थित केले जात आहे.

## शिक्षकांच्या वैद्यकीय बिलांवर

देशात आर्थिक मंदीचे ढग दाटलेले असताना, दीड-दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या शिक्षकांच्या वैद्यकीय प्रस्तावांवर अचानक ही नवीन बाँडची अट टाकण्यात आल्याने शिक्षकांमध्ये मोठा संताप व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेने याबाबत वित्त विभागाचे लेखाधिकारी घायाळ साहेब यांना भेटून सदरील जाचक अट दूर करून शिक्षकांचे सर्व मेडिकल प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यात यावे म्हणून निवेदन दिले आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजेद अहमद म्हणाले की , शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळणे हा त्यांचा हक्क आहे. दीड-दोन वर्ष प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत आणि १०० रुपयेच्या बाँडवरील अतिरिक्त हमीपत्र किंवा नोटरीची अनावश्यक मागणी ताबडतोब थांबविण्यात यावी. या अगोदरच प्रस्तावासोबत शिक्षकांनी स्वतःचे हमीपत्र देऊन मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकाऱ्यांनी याची पडताळणी केले असताना आणखी १०० रुपयांचे बाँड किंवा नोटरीची मागणी नियमबाह्य आणि अन्यायकारक आहे. वास्तविक पाहता सध्या बाजारात शंभर रुपयाचे बॉण्ड बंद आहे. यासंदर्भात वित्त विभागचे लेखाधिकारी घायाळ साहेब यांनी याविषयी सीईओ साहेबांशी चर्चा करून उचित निर्णय घेण्याचे आश्वासन शिक्षक संघटनेला दिला आहे. जिल्हा परिषदचे सीईओ यांनाही शिक्षक संघटनेद्वारे निवेदन देण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष सीईओ जितीन रहमान यांनी याकडे लक्ष देऊन प्रश्न तातडीने निकाली काढावे अशी मागणी होत आहे. याप्रसंगी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजेद अहमद, कार्याध्यक्ष अन्वर खान व हकीम मनियार उपस्थित होते.






# मुंबई पोलिस दलात निवड झालेल्या यश जाधवचा लिंबागणेशकरांकडून जाहीर सत्कार

**लिंबागणेश । सत्यवादी**

महाराष्ट्र पोलिस भरती प्रक्रियेत मुंबई पोलिस दलात निवड झाल्याबद्दल बीड तालुक्यातील लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव यांचे सुपुत्र यश जाधव यांचा ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयात जाहीर सत्कार करण्यात आला. बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून पोखरी (घाट)चे सरपंच बिभीषण मुळीक, पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट तसेच सोमनाथवाडीचे सरपंच किशोर शेळके उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविबापू निर्मळ यांनी केले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, अर्जुन घोलप, समीर शेख, जिल्हा परिषद मुख्याध्यापक दीपक घाटे, बाळकृष्ण थोरात, ॲड. गणेश वाणी, अनंतकाका मुळे, गणपत तागड, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, नाना वाणी, औदुंबर नाईकवाडे, सुरज कदम, महावीर जाधव, गोवर्धन मुळे, सर्पमित्र अशोक जाधव,



सुखदेव वाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर यश जाधव यांनी हे यश संपादन केले आहे. यापूर्वीही त्यांनी रग्बी खेळात राष्ट्रीय स्तरावर निवड होऊन लिंबागणेशचे नाव उज्ज्वल केले आहे. भविष्यातही त्यांच्या हातून अशीच उल्लेखनीय कामगिरी घडो, अशी सद्गुरु चरणी प्रार्थना करून त्यांनी शुभाशीर्वाद दिले.

# लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांना कृतीतून अभिवादन

**बीड । सत्यवादी**




लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बॅनरबाजी, जाहिरातबाजी व अनावश्यक खर्च टाळून एका गरजू मुलीच्या भविष्याला आधार देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

माजलगाव येथील कु. मीरा गंगाधर आलकुटे हिचे कुटुंब अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत आहे. ऊसतोडणीचे काम करत असताना तिच्या वडिलांना अपंगत्व आले आणि कुटुंबाचा आधारच हरपला. अशा परिस्थितीत तिची आई भाजीपाला विकून संसाराचा गाडा चालवत आहे. संकटांशी झुंज देत असलेल्या या कुटुंबाच्या मदतीसाठी पुढाकार घेण्यात आला. स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब ऊसतोड मजूर संघटनेचे अध्यक्ष कृष्णा तिडके यांच्या हस्ते कु. मीरा गंगाधर आलकुटे हिला एक लाख रुपयांचा मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी कृष्णा तिडके म्हणाले, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी आयुष्यभर समाजातील शेवटच्या घटकासाठी संघर्ष केला. गरीब, कष्टकरी, ऊसतोड कामगार, शेतकरी आणि वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त केवळ बॅनरबाजी किंवा दिखाऊ कार्यक्रम करण्यापेक्षा एखाद्या गरजू कुटुंबाच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे.



**दि.१ जुन रोजी वक्फ बोर्डाचे राज्यमंत्री प्राप्त अध्यक्ष समीर काजी यांना बीड येथील कार्यालयात वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी बीड येथील तलाठी शब्बीर पठाण,बीड पोलीस मोहसीनखान पठाण, इंजिनियर आदील पठाण,पत्रकार हमीदखान पठाण.**

# महागाईविरोधात काँग्रेसचा जाफराबादमध्ये जनआक्रोश मोर्चा



**जाफराबाद / सत्यवादी**

केंद्र व राज्य सरकारच्या महागाईविरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी जाफराबाद येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने बैलगाडीसह भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनातून वाढती महागाई, इंधन दरवाढ व जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमतींविरोधात सरकारचा निषेध करण्यात आला.हा मोर्चा काँग्रेस जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख,ज्येष्ठ नेते सुरेश पाटील वाकडे,काँग्रेस नेते सुरेश गवळी, माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे तसेच तालुकाध्यक्ष अजय बनकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. मोर्चामध्ये काँग्रेस पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महागाईमुळे सर्वसामान्यांचे जीवन कठीण झाले असून सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# सगरोळी गावकऱ्यांचा अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम



**नांदेड / सत्यवादी**

बिलोली तालुक्यातील मौजे सगरोळी येथील युवा पिढी व जागरुक तरुणांनी स्वतः पुढाकार घेऊन सगरोळी गावातील स्ट्रीट लाईट (पथ दिवे) बसवण्याचे कार्य चालू करण्यात आले.

गावकऱ्यांचा हा अंधाराकडून प्रकाशाकडे जाणारा उपक्रम खरोखरच अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी आहे! गावातील रस्ते उजळून निघाल्यामुळे गावाच्या सुरक्षिततेत वाढ होईल, रात्रीच्या वेळी ये-जा करणे सोपे होईल आणि परिसराचे सौंदर्यही नक्कीच वाढेल.या उपक्रमामुळे गावातील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मोठी मदत झाली आहे. अशाच सामुदायिक प्रयत्नांमुळे गावे प्रगतीपथावर जातात. प्रशासनाच्या विश्वासावर न राहता सगरोळी गावातील जनता व युवा पिढी पुढाकार घेऊन गावांमधील प्रत्येक गल्लीतील स्ट्रीट लाईट जिथे पोल आहे पण लाईटची व्यवस्था नाही, व जिथे लाईट आहे पण चालू परिस्थितीमध्ये नाही अशा ठिकाणीं गावामध्ये सर्वत्रच स्ट्रीट लाईट पथदिवे बसवण्याचे काम गावातील युवा पिढी वर्ग यांनी हा उपक्रम खूप चांगल्या पद्धतीने उपक्रम राबवला आहे. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक व प्रतिष्ठित नागरिक व युवा मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदित्य महाविद्यालयात रुग्णांच्या प्रत्यक्ष सेवेचे मूल्यमापन कार्यशाळा

## विद्यार्थ्यांच्या क्लीनिकल व व्यावसायिक कौशल्य विकासासाठी ६ तास विशेष प्रशिक्षण



**बीड / सत्यवादी**

शहरातील आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ज्ञान वृद्धिंगत करण्यासोबतच त्यांच्यात उत्कृष्ट क्लीनिकल आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने मूलभूत तत्त्वांपासून ते थेट रुग्णांच्या प्रत्यक्ष सेवेपर्यंतचे मूल्यमापन या विषयावर एक दिवसीय विशेष कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.या भव्य कार्यशाळेत शेकडो विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत थेट रुग्णसेवेचे आणि आधुनिक उपचार पद्धतींचे तांत्रिक धडे गिरवले.या महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे उद्घाटन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सलग सहा तास चाललेल्या या अभ्यासपूर्ण सत्राला प्रमुख वक्त्या व मार्गदर्शक म्हणून डॉ. सुमय्या झरीन शेख (झढ, झहऊ) उपस्थित होत्या. व्यासपीठावर संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, डॉ. सुमय्या झरीन शेख, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राध्यापक डॉ. धनश्री टाकसाळ यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात चांगल्या पदावर जाण्यासाठी प्रेरित करताना सांगितले की, स्वप्न पाहणे सोपे असते, पण ती पूर्ण करण्यासाठी अपार मेहनत आणि जिद्द असावी लागते.

# शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यासाठी लाखो शिवभक्त उपस्थित राहणार - माधवराव देवसरकर

**नांदेड / सत्यवादी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ऐतिहासिक स्मृती जपण्यासाठी अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दरवर्षी दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरा केला जातो. यंदाही हा भव्य सोहळा ५ व ६ जून रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व पारंपरिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे मार्गदर्शक तथा छत्रपती शिवराय आणि राजर्षी शाहू महाराज यांचे वारसदार युवराज छत्रपती संभाजीराजे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार असून, यावर्षी देशभरातून सुमारे ५ ते ७ लाख शिवभक्त, इतिहास संशोधक,



अभ्यासक, इतिहासप्रेमी व पर्यटक रायगडावर उपस्थित राहण्याची शक्यता असल्याची माहिती महोत्सव समितीचे सदस्य माधवराव देवसरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा नांदेड जिल्ह्यातूनही सुमारे ३ ते ३.५ हजार शिवप्रेमी रायगडावर जाणार असून, जिल्ह्यातील विविध भागांतून शिवभक्तांच्या वाहनांचे ताफे रायगडकडे रवाना होणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. शिवभक्तांना सर्व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समितीतर्फे व्यापक नियोजन करण्यात आले आहे. ५ व ६ जून रोजी विविध सांस्कृतिक, ऐतिहासिक व पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सोहळ्याची सुरुवात पहाटे रायगडावरील नगारखान्यासमोर भगवा ध्वज उभारून करण्यात येणार आहे. त्यानंतर मुख्य शिवराज्याभिषेक सोहळा पार पडेल. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर सुवर्णनाण्यांचा अभिषेक करण्यात येणार आहे. रणवाद्य, हलगी, घुमके व कैताळाच्या गजरात होळीच्या माळावर शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत. तसेच भव्य पालखी सोहळा, छत्र-चामरासह शिवछत्रपतींच्या प्रतिमेची शोभायात्रा आणि पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणारे शिवभक्त हे सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत.

# तरुणांमध्येही हृदयविकार - डॉ.रोहन मालुरे

**बीड / सत्यवादी**

आजकाल अनेकांमध्ये कोलेस्ट्रॉलची समस्या वाढताना दिसत आहे. केवळ प्रौढ व्यक्ती नाही, तर तरुणांमध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणात पहायला मिळते. सुरुवातीला साधा वाटणारा हा त्रास पुढे हृदयविकाराच्या गंभीर समस्यांचे कारण ठरू शकतो. आपल्या शरीरात कोलेस्ट्रॉल वाढते, तेव्हा शरीर काही ना काही संकेत देत असते.कोलेस्ट्रॉलचे दोन प्रकार असतात, यामध्ये एलडीएल आणि एचडीएल यांचा समावेश आहे. यापैकी एलडीएलला वाईट कोलेस्ट्रॉल म्हटले जाते. याचे कारण ते रक्तवाहिन्यांमध्ये साचून प्लाक तयार करते आणि हृदयाच्या समस्यांचा धोका वाढवते, तर एचडीएल चांगले कोलेस्ट्रॉल मानले जाते. रक्तात एलडीएल कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढले की, हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो. ही समस्या अचानक वाढते, सुरुवातीला कोणतीही ठळक लक्षणे दिसत नाहीत.

१) छातीत दुखणे : छातीत दुखणे हे वाढलेल्या कोलेस्ट्रॉलचे लक्षण आहे. एलडीएल मुळे हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये प्लाक साचतो त्यामुळे त्या अरुंद होतात. अशावेळी छातीत दडपण, जळजळ असा त्रास होतो. त्याचप्रमाणे हे दुखणे हात, मान, जबडा किंवा पाठीपर्यंत पसरू शकते.

२) त्वचेवर डाग दिसणे : त्वचेवर दिसणारे पिवळसर डाग किंवा गाठी यांच्याकडे दुर्लक्ष करू नये. हेदेखील उच्च कोलेस्ट्रॉलचे एक लक्षण आहे. हे डोळ्यांच्या आसपास, कोपर, गुडघे, बोटांच्या सांध्यांवर किंवा टाचांवर दिसू शकतात. शरीरात जास्त एलडीएल साचल्यामुळे हे डाग तयार होतात. अशावेळी आहारात बदल करूनही समस्या दूर करता येते.

३)श्वास घेण्यास त्रास होणे : श्वास घेण्यास त्रास होणे हाही एक संकेत असू शकतो.रक्तवाहिन्या अरुंद झाल्यामुळे हृदयाला जास्त मेहनत घ्यावी लागते. परिणामी तुमच्या शरीराला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे जिने



चढताना, वेगाने चालताना किंवा झोपल्यावरही श्वास घ्यायला त्रास होऊ शकतो.

४) पायात वेदना होणे : तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार पायात वेदना किंवा आकडी येणे (इंटरमिटंट क्लॉडिकेशन) हेदेखील एलडीएल कोलेस्ट्रॉल वाढल्याचे लक्षण असू शकते. यामध्ये चालताना पोटऱ्या, मांड्या किंवा कंबरेमध्ये वेदना होतात.ङ्गङ्गहे रक्तपुरवठा कमी झाल्यामुळे होते आणि यामुळे चालण्याची क्षमतादेखील कमी होते.सतत थकवा जाणवणे

५) सतत थकवा जाणवणे हेदेखील दुर्लक्षित करू नये. शरीराला पुरेसा रक्तपुरवठा न झाल्यामुळे स्नायूंना व अवयवांना पोषण मिळत नाही. त्यामुळे व्यक्तीला सतत थकल्यासारखे वाटू लागते. हा थकवा आराम करूनही कमी होत नाही.

६) स्मरणशक्ती कमी होणे: ज्या व्यक्तीचे वाईट कोलेस्ट्रॉल वाढलेले असते त्या व्यक्तीला स्मरणशक्ती कमी होणे, डोकेदुखी किंवा ब्रेन फॉग सारखी लक्षणंही दिसू शकतात. मेंदूकडे जाणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथ निर्माण झाल्यामुळे लक्ष केंद्रित करणे कठीण होते. अशावेळी त्या व्यक्तीला चक्कर येण्याचा त्रासही होऊ शकतो. **असे मत डॉ. रोहन मालुरे, (एम.बी.बी.एस.एम.डी.मेडीसीन) विठाई हॉस्पिटल,आठवडी बाजार रोड,गांधी चौक,गांधीनगर,कळंब मो.९८६०५६०५५७**

# सन्मान कतृत्वाचा,सोहळा गुणवंताचा मोठ्या उत्साहात साजरा !




**पाडळी / सत्यवादी**

शिरूर कासार तालुक्यातील दहावी बारावी च्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश ,पोलीस उपनिरिक्षक म्हणून आणि पोलीस पाटील म्हणून झालेली निवड ही निश्चितच तालुक्याच्या दृष्टीने यशस्वी अभिमानास्पद असल्याने पाडळीचे सरपंच गहिनाथ पाखरे यांनी पुढाकार घेऊन सन्मान कतृत्वाचा सोहळा गुणवंताचा हा कार्यक्रम सिध्देश्वर मंगल कार्यालयात सोमवारी घेतला यात संत, महंत ,प्रशासकिय अधिकारी आणि सामाजीक क्षेत्र त्रातील धुरिणांची उपस्थिती होती .

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीक्षेत्र भगवानगडाचे चतुर्थ उत्तराधिकारी महंत कृष्णा महाराज शास्त्री तर प्रमुख उपस्थितीत सिध्देश्वर संस्थानचे उत्तराधिकारी महंत विवेक महाराज शास्त्री यांचे सह युवानेते जयदत्त धस , रामकृष्ण बांगर ,प्रथम नगराध्यक्ष रोहीदास पाटील ,माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील गटनेते गणेश भांडेकर ,माजी सभापती बाबुराव केदार ,माजी जि प सदस्य आश्रुबा खरमाटे ,रामदास हांगे ,कालिदास आघाव ,शेषनारायण खरमाटे प्रशासकीय अधिकारी अभिजित पाखरे (आय आर एस ) तहसिलदार सुरेश घोळवे ,गटविकास अधिकारी भारत नागरे यांची होती .

प्रास्ताविक भाषणात शिरूर तालुका कात टाकत असुन आता अधिका-यांचा तालुका अशी ओळख निर्माण करत असल्याचे आय आर एस अधिकारी अभिजीत पाखरे यांनी सांगितले .पोलीस अधिकारी ,पोलीस पाटील यांचे शिवाय वेगवेगळ्या क्षेत्रात नावलौकिक हस्तगत केला जातो आहे ,उपजिल्हाधिकारी म्हणून शिरूर तालुक्यातील वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत ,दहावी बारावी परिक्षेत मिळवलेले गुण निश्चित गौरवास्पद आहे मात्र अभ्यासात सातत्य ठेवण्याची गरज असल्याचे पाखरे यांनी सांगितले.

# कोट्यावधीची उधळपट्टी करूनही पाटोदा आगाराचे काम निकृष्ठ-गर्जे

**पाटोदा । सत्यवादी**

**राज्य परिवहन महामंडळाच्या पाटोदा आगारात करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप समोर आला असून निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण काम पूर्ण झाल्याचे दाखवून निधी उचलण्याचा प्रयत्न सुरू असल्याची आरोप करत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते बाबासाहेब गर्जे यांनी या संदर्भात तक्रार थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.**

बाबासाहेब गर्जे यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या तक्रार आजाद म्हटले आहे की , मुख्य रस्त्याकडील संरक्षक भिंतीचे काम तसेच आगाराच्या मागील बाजूस करण्यात येणारे सिमेंट काँक्रिटीकरण अद्याप अपूर्ण आहे. एवढेच नव्हे तर पावसाळा तोंडावर असताना पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक नाली व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने आगार परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची शक्यता व्यक्त करण्यात

**गर्जे यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार**

आली आहे. या कामासाठी सुमारे साडेचार कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती असून प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कामाचा दर्जा पाहता निधीचा योग्य वापर झाला आहे का, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे काम पूर्ण झाल्याचे दाखवून संबंधित ठेकेदाराकडून बिल उचलण्याचे षडयंत्र सुरू असल्याचाही गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, कामाच्या ठिकाणी अंदाजपत्रक व निधीची माहिती दर्शविणारा फलकही लावण्यात आलेला नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. तसेच संबंधित एजन्सी व कामावर देखरेख

(पान २ वर...)

### रुग्णसेवक अमजद खान यांना क्रांतीवीर अशफाक उल्ला खान
# स्मृती मानवतावादी गौरव पुरस्कार!

**बीड । सत्यवादी**

गेल्या एका दशकापेक्षा जास्त कार्यकाळापासून स्वतःचे संपूर्ण आयुष्य गोरगरीब रुग्णांच्या सेवेसाठी समर्पित करणारे आणि समाजातील उपेक्षितांचे अश्रू पुसणारे बीडचे रुग्णसेवक अमजद खान यांना यंदाचा अत्यंत मानाचा व प्रतिष्ठित क्रांतीवीर अशफाक उल्ला खान स्मृती मानवतावादी गौरव पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या वतीने या सर्वोच्च पुरस्काराची अधिकृत घोषणा करण्यात



आली.'साप्ताहिक युवा लोकमित्र'तर्फे समाजाच्या कल्याणासाठी आपले रक्त आटवणाऱ्या खऱ्या हिरोंचा गौरव केला जातो. पुरस्कार निवड समितीने अमजद खान यांच्या अथांग आणि संवेदनशील मानवसेवेची या पुरस्कारासाठी एकमुखाने निवड केली आहे.अमजद खान हे गेल्या १० ते १२ वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात गरजू रुग्णांसाठी देवदूत म्हणून कार्यरत आहेत. कर्करोग (उरपलशी), किडनीचे गंभीर आजार किंवा इतर दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या अत्यंत गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे, त्यांच्या औषधोपचाराची व्यवस्था करणे यासाठी अमजद खान अहोरात्र झटत असतात.त्यांच्या सेवेचे

(पान २ वर...)

# फिल्टर पाणीचे आश्वासन हवेत विरले
## पाटोद्यात घाण पाण्यामुळे नागरिकांचा अनोखा निषेध

**पाटोदा । सत्यवादी**

पाटोदा शहराला नगरपंचायत अस्तित्वात येऊन तब्बल दहा वर्षांचा कालावधी होत असला तरी नागरिकांना आजपर्यंत नळाद्वारे शुद्ध व फिल्टर केलेले पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात प्रशासनाला यश आलेले नाही. मात्र प्रत्येक निवडणुकीत फिल्टर पाणी देणार या आश्वासनांचा पाऊस पडतो, अशी तीव्र नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

यंदाचा उन्हाळा विक्रमी उष्णतेचा ठरत असताना मार्च महिन्यापासूनच अनेक खाजगी जलस्रोत आटल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. सांडपाणी व इतर वापरासाठी नगरपंचायतीच्या नळ योजनेवर नागरिकांची भिस्त होती. मात्र नगरपंचायतीच्या नियोजनशून्य कारभारामुळे आठ दिवसाऐवजी



तब्बल पंधरा-पंधरा दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप होत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे नळाद्वारे येणारे पाणी दुर्गंधीयुक्त व अस्वच्छ असल्याने नागरिकांच्या

(पान २ वर...)

# २५ वर्षे अपघातमुक्त सेवेसाठी एसटी चालक अरुण गिरी यांचा गौरव
## परळी आगारातून निवड झालेले एकमेव चालक

**परळी । सत्यवादी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त २५ वर्षे विनाअपघात सेवा बजावल्याबद्दल गाढे पिंपळगावचे सुपुत्र तथा एसटी बस चालक अरुण नारायण गिरी यांचा बीड विभागात विशेष सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, या गौरवासाठी परळी आगारातून निवड झालेले ते एकमेव चालक ठरले आहेत. कर्तव्यनिष्ठा, संयम आणि सुरक्षित प्रवासी सेवेचा आदर्श जपत अरुण गिरी यांनी सलग २५ वर्षे अपघातमुक्त सेवा बजावली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महामंडळाच्या वतीने त्यांना गौरवचिन्ह, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन



सन्मानित करण्यात आले. या सन्मान सोहळ्यात विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि सहकाऱ्यांच्या उपस्थितीत गिरी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या

(पान २ वर...)

# श्रीमती शारजाबाई डाके यांचे निधन

**परळी । सत्यवादी**



परळी वैजनाथ येथील गणेशपार भागातील देशमुख गल्ली परिसरातील ज्येष्ठ, सुस्वभावी, धार्मिक व सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीमती शारजाबाई जगन्नाथ डाके यांचे दीर्घ आजाराने सकाळी ८:०० वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून एक प्रेमळ, मनमिळावू व जिव्हाळ्याचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

शारजाबाई डाके या अत्यंत कष्टाळू व संघर्षशील महिला होत्या. शेतमजुरी व मोलमजुरी करून त्यांनी आपल्या कुटुंबाचा संसार सांभाळला. प्रतिकूल परिस्थितीतही मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देत

(पान २ वर...)

# शिक्षकांच्या वैद्यकीय बिलांवर १०० रुपये बाँडचा अडथळा'

- ३०० पेक्षा जास्त मेडिकल प्रस्ताव वित्त विभागाने फेटाळले
- बाँड व नोटरीची अट दूर करा; मेडिकल प्रस्ताव तातडीने निकाली काढावे
- महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेची मागणी

**धारूर । सत्यवादी**

कॅन्सर, बायपास, किडनी व इतर गंभीर आजारावर वैद्यकीय उपचारांसाठी खर्च केलेल्या शिक्षकांना प्रतिपूर्ती मिळण्याऐवजी जिल्हा परिषदेच्या वित्त व लेखा विभागाने नवीन अट लादली आहे. या नवीन तुगलकी फर्मानमुळे दीड-दोन वर्षाने प्रलंबित प्रस्तावांना निकाली काढण्यासाठी आणखी धावपळ करावी लागणार असल्याचे चिन्हे दिसून येत आहे. शासनाच्या दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ च्या परिपत्रकानुसार स्टॅम्प पेपरची गरज नसतानाही शिक्षकांची अडवणूक करून मेडीकलच्या प्रस्तावात १०० रुपयांच्या बाँडवर हमीपत्र



नसल्याचे कारण पुढे करून जवळपास ३०० पेक्षा जास्त वैद्यकीय प्रस्ताव एकदम परत पाठवण्यात आले आहेत.

(पान २ वर...)



महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळचे अध्यक्ष व अल्पसंख्याक शिवसेना (शिंदे) महाराष्ट्र अध्यक्ष समीर गुलाम नबी काझी यांचे वाढदिवस निमित साहेबांचा सत्कार करतांना शेख इरफान पटेल.

# एसआयआर कामकाजात अचूकता व गती राखा : उपजिल्हा निवडणूक अधिकारी घोडे

**धारूर । सत्यवादी**


विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी धारूर तहसील कार्यालयात तालुक्यातील बूथ लेव्हल अधिकारी व पर्यवेक्षकांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री. घोडे पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना कामकाजात अचूकता, पारदर्शकता व गती राखण्याच्या सूचना दिल्या.



यावेळी घोडे पाटील यांनी मतदार यादी पुनरीक्षणाचे काम निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार विहित मुदतीत पूर्ण करण्याचे आवाहन केले. सर्व इडज व पर्यवेक्षकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील मतदारांचे मॅपिंग शंभर टक्के पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच डखठ कार्यक्रमांतर्गत करावयाच्या विविध कामांची

(पान २ वर...)

# दलित वस्तीतील कोट्यवधींची विकासकामे रखडली
## सिताईकडे कामाची जबाबदारी असूनही अद्याप सुरुवात नाही





**बीड । सत्यवादी**

बीड नगरपरिषद अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेमधून प्रभाग क्रमांक २ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या रस्ता व नाली विकासकामांना अद्याप सुरुवात न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत मुख्याधिकारी साहेब, नगरपरिषद बीड यांना निवेदन देण्यात आले असून संबंधित कंत्राटदार सिताई एजन्सी, बीड यांनाही निवेदनाची प्रत देण्यात आली आहे.

निवेदनानुसार, जिजामाता चौक पॅराडाईज हॉस्पिटल ते स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स हिना नगर परिसरातील रस्ता व नाली कामासाठी ९९.९९ लाख रुपये तर छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल परिसरातील स्टेडियम रोड रस्ता व नाली कामासाठी १.९९ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकासकामांची जबाबदारी सिताई एजन्सीकडे सोपविण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मात्र मंजुरी मिळून सुमारे दीड महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही प्रत्यक्ष कामांना सुरुवात झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळा तोंडावर आलेला असताना रस्त्यांची दुरवस्था, नाल्यांतील अडथळे आणि पाणी साचण्याच्या समस्या अधिक गंभीर उपस्थित केला आहे की, निधी मंजूर झाला, कामाची जबाबदारी कंत्राटदाराकडे देण्यात आली, तरी प्रत्यक्ष कामाला विलंब का होत आहे?यासंदर्भात नगरपरिषद प्रशासनाने आणि संबंधित कंत्राटदार सिताई एजन्सीने तात्काळ विकासकामांना सुरुवात करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. हे निवेदन सामाजिक कार्यकर्ते प्रा. सनी विष्णू वाघमारे यांनी मुख्याधिकारी साहेब, नगर परिषद बीड यांना सादर केले असून नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची मागणी केली आहे.

# केंद्रेकर यांनी आखून दिलेली लक्ष्मण रेषा कूचकामी ठरणार काय?
## जनता फाउंडेशन बीडचे रिजवान बागवान यांचा सवाल

**बीड । सत्यवादी**

शहरातील भाजी मंडई च्या मुख्य रस्त्यावर तत्कालीन जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांनी आखून दिलेली लक्ष्मण रेषा कुचकामी ठरणार काय? असा सवाल जनता फाउंडेशन बीड चे संस्थापक अध्यक्ष रिजवान बागवान यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, काही दिवसांपूर्वी भाजी मंडईच्या मुख्य रस्त्यावर मधोमध बसून भाजीपाला विकणाऱ्यांवर शासन-प्रशासनाच्या आदेशावरून बीड नगरपरिषदेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मिळून अतिक्रमण हटाव मोहिमेची कारवाई केली. कारवाई योग्य व रास्त असताना काही लोकांनी त्यात जाणून-बुजून राजकारण आणले तर काहींनी त्यास धार्मिक रंग देण्याचाही प्रयत्न केला. यामुळे निर्माण झालेल्या दबाव तंत्रासमोर झुकून विद्यमान सत्ताधारी आणि लोकप्रतिनिधी यांनी अक्षरशः लोटांगण घेत संबंधित अतिक्रमण करणाऱ्या आजीमाय ची माफी मागणे, घरी जाऊन भेटी देत साड्या लुगडे व आर्थिक मदत देणे असे काही बाही कृत्य केले. हे पाहून फक्त बीड शहरच नाही तर बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातही बीड



(पान २ वर...)









This newspaper is published by **Shaikh Rehan Shaikh Feroz** from H.No.3-1-292, Imampur Road, Dhole Wasti, Beed, Maharashtra - 431122 on behalf of Shaikh Rehan Shaikh Feroz, edited by Shaikh Rehan Shaikh Feroz and printed by Abdul Raheman Yusuf Shaikh at Nirmitee Prints, Old Bhaji Market, House No.2-1-54, In Front of Bank of Badoda, Subhash Road, Beed, Maharashtra - 431122.
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com**

**हे पत्र मालक, प्रकाशक शेख रेहान शेख फेरोज यांनी निर्मिती प्रिंट्स, जुनी भाजी मार्केट, घर क्र.२-१-५४, बँक ऑफ बडोदा समोर, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड महाराष्ट्र - ४३११२२ येथे छापून दैनिक आपल्या लोकांचा सत्यवादी कार्यालय इमामपुर रोड, बीड येथे प्रसिद्ध केले.**
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com ✻ संपादक : शेख रेहान शेख फेरोज**